**अर्जदारातर्फे साक्षीदाराचा** शपथेवर पुरावा

नि.क्र.२०

मी शपथेवर सत्यकथन करते ते येणे प्रमाणे की,
माझे नांव ः उमाकांत गंगाधर अदमाने,
वय ः ४७ वर्षे,
धंदा ः नोकरी,
राहाणार ः निता रोहिदास लवांडे, ६२/१०/६, माऊली नगर, दिघी, पवार हॉस्पीटलमागे, पुणे ४११०१५,

माझे शपथपत्रातील मजकूर मी वाचला असून तो सत्य व बरोबर आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. सबब, मी तो सत्यापीत केला आहे.
(प्रस्तूत साक्षीदाराने शपथपत्रातील मजकूर शपथेवर सत्यापीत केल्याने दि.प्र. संहितेच्या आदेश १८ नियम ४ अन्वये त्यास पुरावे कामी मान्य करण्यात येत आहे.)

'श्रवणोत्तर स्विकृत'
'समक्ष'

दि. ०८.०८.२०२३

(मंदार प्र. पांडे)
१३ वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
अहमदनगर.

<u>अधिकचा सरतपास अर्जदारतर्फे वि. अधिवक्ता श्री.एन.टी.निसर्गन यांचेव्दारे.</u>

१४. दस्तऐवजांची यादी नि.क्र.३ समवेत अनु.क्र.०१ ते ५ सादर केलेल्या दस्तऐवजांना निशाणी देण्यास गैरअर्जदाराने ना हरकत दिल्याने अनु.क्र. नि.क्र. २१ ते २५ देण्यात येत आहे.

<u>उलटतपास सामनेवालतर्फे वि. अधिवक्ता श्री.पी. के. मेहेर यांचेव्दारे.</u>

१५. मी पुणे कार्यालयात कार्यरत आहे. माझे कामकाजाचे ठिकाण दिघी, पुणे येथे आहे. मी दिघी येथील माझे घरुनच अर्जदार कंपनीचे काम करतो. मी मागील ८ ते १० वर्षांपासून अर्जदार कंपनीत कार्यरत आहे. मी अर्जदार कंपनीत कार्यरत असल्याबाबतचे दस्त आता माझेकडे नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, मी ते दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे की, माझेकडे लेखापाल म्हणुन अर्जदार कंपनीचे सध्या कोणतेही काम सुरू नाही. हे म्हणणे खरे की, रांजणगाव येथे अर्जदार कंपनीची फॅक्टरी होती. श्री. प्रदीप अग्रवाल हे अर्जदार कंपनीचे मालक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला सामनेवाले यांचे विरोधांत अहमदनगर न्यायालयात प्रकरण दाखल करणे कामी व चालविणे कामी कोणतेही अधिकारपत्र अर्जदार कंपनीने दिलेले नाही. हे म्हणणे खरे की, अभिलेखावरील अधिकारपत्र <u>नि.क्र.२५</u> मध्ये सामनेवाले कंपनीचे विरुध्द नगर न्यायालयात प्रकरण दाखल करण्याचे अधिकार देण्यात आल्याचे नमुद नाही. प्रदीप अग्रवाल यांनी सामनेवाले यांचे विरोधांत न्यायालयात प्रकरण दाखल करणेबाबत संचालक मंडळाने ठरावाव्दारे त्यांना अधिकार दिले आहेत किंवा कसे ते मला माहित नाही. तसा ठराव झाल्याचे मी पाहिलेले नाही.

१६. प्रस्तुत अर्ज दाखल करण्यापूर्वी मी वि दि.दा.क्र.१५/२०१९ चे कागदपत्र पाहिले नव्हते. त्या दाव्यातील कोणत्या दस्तऐवजांच्या प्रमाणीत सत्यप्रती प्राप्त करावयाच्या आहेत ते आमचे विकलांनी ठरविले. वकिलांनी मुळ दाव्याचे कोणते दस्तऐवज पाहिले याची माहिती मी त्यांचेकडून घेतली होती. मुळ दावा दाखल करण्यापूर्वी सामनेवाले (मुळ दाव्यातील वादी) यांनी प्रस्तुत प्रकरणातील अर्जैदार कंपनीला पाठविलेली लेखी सुचना व नोंदणीकृत

डाकेची पोहोच पावती मी पाहिली होती. हे म्हणणे खरे की, "डी-३८, एम.आय.डी.सी., रांजणगाव, ता. शिरुर, जि. पुणे" या पत्त्यावर आमच्या कंपनीची फॅक्टरी होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या पत्त्यावर फॅक्टरीशी निगडीत प्रशासकीय कामकाजाकरीता प्रशासकीय कार्यालय देखील होते. हे म्हणणे खरे की, त्या पत्त्यावर फॅक्टरीचे कामकाज सुरु असतांना प्रशासकीय कार्यालय सुरु होते. हे म्हणणे खरे की, सामनेवाले सोबत आमचे कंपनीचा व्यवहार झाला आहे. हे म्हणणे खरे की, सामनेवालेसोबत झालेल्या व्यवहाराची नोंद आमचेकडील खाते उता-यात आहे. त्या खाते उता-याची प्रत मी पाहिलेली नाही. त्याची प्रत मी सोबत आणलेली नाही. सामनेवाले यांचेसोबत कोणत्या कालावधीत आमच्या कंपीनचा व्यवहार झाले, ते मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे की, सामनेवाले यांचेसोबत जो काही व्यवहार झाला तो रांजणगाव येथील फॅक्टरीचे मार्फत झाला. त्या व्यवहारापोटी आमची कंपनी सामनेवाले यांना रक्कम देणे लागत होती. रांजणगाव येथील कामकाज बंद करुन नागपूर येथे स्थलांतरीत केल्याचे सामनेवाले यांना लेखी सुचित केल्याचे दस्त मी न्यायालयात दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसे लेखी सुचीत केल्याचा दर्शविणारा दस्त आमचेकडे नाही. हे म्हणणे खरे की, रांजणगाव येथील फॅक्टरी व कामकाजाची जागा आजही अर्जदार कंपनीच्या मालकीची आहे. हे म्हणणे खरे की, रांजणगाव येथील फॅक्टरी स्थलांतरीत केल्यानंतर देखील तेथील सुरक्षा रक्षक आजही नियमीत कामावर आहे.

१७. मी मुळ वि.दि.दा.क्र.१५/२०१९ चा न्यायनिर्णय वाचला आहे. हे म्हणणे खरे की, अर्जदार कंपनीला नोंदणीकृत डाकेने मुळ दाव्याचे समन्स बजावण्यात आल्याचे पोहोच पावतीवरुन निष्पन्न होत असल्याचे व त्यामुळे दावा आमचे विरोधांत एकतर्फा चालविण्यात आल्याचे न्यायनिर्णयात नमुद

आहे. मुळ दाव्यात एकतर्फा दावा चालविण्याचा पारीत केलेला आदेश, बेकायदेशीर, चुकीचा, अनावधानाने केलेला व सुरुवातीपासून चुक असलेला होता, असे माझे पुराव्याचे शपथपत्रात मी नमुद केले आहे कारण ज्या नोंदणीकृत डाकेच्या पोहोच पावतीच्या आधारे तसा आदेश पारीत झाला त्या पोहोच पावतीवरील सही केलेली व्यक्ती आम्हाला मिळून येत नाही. हे म्हणणे खरे की, आम्ही सामनेवाले कंपनीला देणे लागत असलेल्या रकमेचा धनादेश त्यांना दिल्याचे मुळ दाव्याचे निकालपत्रात नमुद आहे.

१८. हे म्हणणे खरे की, आमच्या कंपनीचे मालक प्रदीप अग्रवाल यांचा मोबाईल क्र.९८२३०३०११६ हा आहे. हे म्हणणे खरे की, आम्ही आमच्या कंपनीचे विरोधांत प्रलंबित असलेलया न्यायालयीन प्रकरणांचा शोध घेत असल्याचे व त्या शोध मोहिमेत आम्हाला वि.द.क्र.४४/२०२१ पुणे न्यायालयात प्रलंबित असल्याचे आढळून आल्याचा माझे पुराव्यातील शपथपत्रातील मजकुर चुक आहे. मी आता सांगतो की, प्रस्तुत प्रकरण दाखल करण्याचे १५ ते २० दिवसपूर्वी आम्हाला वि.द.क्र.४४/२०२१ प्रलंबित असल्याचे कळाले. मी प्रस्तुत दाव्यात प्रदीप अग्रवाल यांची साक्ष नोंदविणार नाही. दि.१५/०९/२०१९ रोजी सामनेवाले फर्मचे भागीदाराने प्रदीप अग्रवाल यांना ९८२३०३०११६ या क्रमांकावर व्हॉटस् ॲप व्दारे मुळ दाव्यातील निकालाचा ई-कोर्टस् चे अधिकृत पोर्टलवरील निकालाचा स्क्रीन शॉट पाठविला होता किंवा कसे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे की, सामनेवाले यांचा आमच्या कंपनीच्या नागपूर कार्यालयासोबत कधीही कोणताही व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाले आमचेकडून घेणे लागत असल्याची रक्कम देण्याचे टाळण्यासाठी आम्ही सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर प्रकरण दाखल करण्याचा तथा

त्यामध्ये पुरावा देण्याचा कोणताही कायदेशिर अधिकार नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

‘श्रवणोत्तर स्विकृत’

‘समक्ष’

दि. ०८.०८.२०२३

(मंदार प्र. पांडे)
१३ वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
अहमदनगर.